**ग्रामीण / नागरी नळ योजनांच्या उद्‌भवाबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन निर्णय क्र.ग्रापापु १०९८/प्र.क्र.२३५/पापु-०७**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**दिनांक :- १८ डिसेंबर, १९९८**

**संदर्भ :-**

(१) शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु १०८३/सीआर-५३६३/३९, दि.२८ ऑक्टोबर, १९८३

(२) शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु १०८६/सीआर-१०९८/३७, दि.२० जानेवारी, १९८६

(३) शासन निर्णय, पाटबंधारे विभाग क्र.पिपापु-१०८६/६११/सिं.(व्य), दि.५ जानेवारी, १९८७

(४) शासन पृष्ठांकन, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु १०८९/सीआर-१५९/३९-अ, दि.१६ ऑगस्ट, १९८९

(५) शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु १०८९/सीआर-२२/३९-अ, दि.१७ ऑक्टोबर, १९८९

(६) शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग, क्र.विसआ-१०८८/सीआर ५५६४/४१, दि.२२ मे, १९९०

(७) शासन पत्र, ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु १०९१/सीआर ३१३/३९-अ, दि.२१ जानेवारी, १९९२

(८) शासन पत्र , ग्राम विकास विभाग, क्र.ग्रापापु १०९२/सीआर-६६४/३९-अ, दि.२ जुलै, १९९२

(९) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.जसंप्रा-१०९७/प्र.क्र.७२/पापु-०७, दि.२९ नोव्हेंबर, १९९७

(१०) शासन निर्णय, पाटबंधारे विभाग क्र.संकीर्ण-१०९८/२२/सिं.व्य (धोरण), दि.२३ फेब्रुवारी ९८

(११) शासन निर्णय, पाटबंधारे विभाग क्र.संकीर्ण-१०९८/१०/सिं.व्य (धोरण), दि.२३ फेब्रुवारी, १९९८

(१२) शासन निर्णय, पाटबंधारे विभाग क्र.संकीर्ण-१०९७/३७६/सिं.व्य (धोरण), दि.२१ एप्रिल, १९९८

**प्रस्तावना :-**

संदर्भांकित आदेशानुसार नळ योजनांच्या उद्‌भवाबाबत विविध सूचना प्रस्तृत करण्यात आल्या आहेत. नळ योजनांच्या कार्यान्वयानाच्या दृष्टीने सदर सूचना महत्वाच्या असल्यामुळे त्या एकत्रित स्वरुपात देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :-

नळ योजनांचे अंदाज व आराखडे तयार करतांना व कार्यान्वयानाच्या वेळी योजनांच्या उद्‌भवाबाबत खाली निर्देशिलेल्या सूचनांचे कसोशीने पालन करावे असे आदेश शासन देत आहे :-

१) सर्वसाधारणपणे केवळ पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र धरणे प्रस्तावित बांधली जाऊ नयेत. नळ योजनांसाठी अस्तित्वात असलेले किंवा एक-दोन वर्षात पूर्ण होणोरे पाटबंधारे किंवा अन्य प्रकल्प विश्वासार्ह उद्‌भव म्हणून निवडण्यात यावेत.

२) नळ योजनांसाठी पाटबंधारे विभाग/महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/महानगरपालिका /नगरपालिका यांची धरणे अथवा पाणी पुरवठा योजनांची निवड उद्‌भव म्हणून केल्यास संबंधित विभाग/संस्था यांचेकडून धरणे/योजना यातून पाणी उचलण्याबाबत लेखी परवानगी प्राप्त करावी व अशी परवानगी प्राप्त झाल्यावरच योजनांचे अंदाज/आराखडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात यावेत. तसेच संबंधित विभाग/संस्था यांचेकडे पाण्याचे आरक्षण मागताना ते प्रस्तावित योजनेतील प्रकल्पित लोकसख्येस विहित प्रमाणात पुरवता येईल या गृहीतावर मागण्यात यावे. त्यानुसार पाटबंधारे विभागाने पुर्वीच्या पाणी आरक्षण धोरणात संदर्भित क्र.१०,११ व १२ च्या आदेशानुसार आरक्षणाचे अधिकार खालीलप्रमाणे सुधारित केले आहेत.

पाटबधारे प्रकल्पातील उपयुक्त पाणी साठयाच्या

१) १५ % पर्यंतचे पाणी आरक्षणाचे अधिकार पाटबंधारे विभागाच्या क्षेत्रिय मुख्य अभियंत्यांना

२) १६ ते २५ टक्के पर्यंतचे पाणी आरक्षणाचे अधिकार मंत्रालय आंतरविभागीय सचिव समितीला,

३) २५ टक्के पेक्षा जास्त पाणी आरक्षणाचे अधिकार मंत्रीमंडळ उच्चाधिकार समितीला देण्यांत आलेले आहेत.

३) नळ योजनांसाठी शक्यतोवर पाटबंधारे विभागाचे कालवे उद्‌भव म्हणून निवडू नयेत, त्या ऐवजी थेट तलावातूनच योजनांसाठी पाणी उचलण्यात यावे. निरुपायाने कालावा हाच उद्‌भव म्हणून निश्चित करणे भाग पडल्यास, बारमाही कालव्यांच्या बाबतीत एक महिन्याच्या गरजेएवढी व आठमाही कालव्याच्या बाबतीत पाच महिन्याच्या गरजेएवढी सावठवणक्षमता (साठवण तलाव) निर्माण करण्याची दक्षता घ्यावी. कालव्याच्या/धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने, कालाव्याच्या/ धरणाच्या सीमेपासून २०० मीटर अंतरामध्ये स्फोटक पदार्थाचा उपयोग करणे आवश्यक असेल असे खनीकर्म अथवा दगड खाणकामविषयक कार्य पाटबंधारे विभागाच्या शक्तीप्रदान अधिका-यांच्या पूर्वानुमतीशिवाय करता येणार नाही अशी वैधानिक तरतूद असल्यामुळे, नळ योजनासाठी कालवे/धरणाच्या २०० मीटरअंतरात उद्‌भव विहीर घेण्याचे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने शिफारस केल्यास, अशी उद्‌भव विहीर घेण्यापेक्षा पाटबंधारे विभागाची पूर्वानुमती प्राप्त करुन, प्रत्यक्ष, धरण हाच उद्‌भव म्हणून निवडण्यात यावा.

४) भूपृष्ठावरील पाण्याबरोबरच भूजलाचा वापर करणे अत्यावश्यक आहे. सबब उद्‌भवाचा विचार करतांना, भूजल उद्‌भवावर प्रथम भर द्यावा आणि हा पर्याय उपलब्ध नसल्यास भूपृष्ठावरील उद्‌भवाचा नळ योजनेसाठी विचार करतांना उद्‌भव हा ९५ टक्के विश्वासार्हतेवर आधारित असेल अशाचा योजना हाती घ्याव्यात.

५) उद्‌भवातून अपेक्षित पाणी पुरवठा होत/होणार नाही, या कारणास्तव नळ योजनेचा उद्‌भव बदलण्यापुर्वी भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या सहाय्याने नियोजित उद्‌भवाच्या जागी, हनवेल रिंग विंधण करुन अपेक्षित पाणी उपलब्ध होते किंवा नाही याची चाचणी घ्यावी. अशा चाचणीनंतर नियोजित उद्‌भवातून अपेक्षित पाणी उपलब्ध होणार नाही असे जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिकांनी प्रमाणित केल्यावरच नियोजित उद्‌भव बदलण्याबाबत विचार करावा, जेणेकरुन योजना विहित कालावधीत पूर्ण होउान योजनेच्या खर्चात वाढ होणार नाही.

६)  उद्भवास लागलेले पाणी क्षारयुक्त, अतिलोह आणि क्लोराईड इत्यादी कारणामुळे पिण्यायोग्य नसते. सबब, उद्भवास लागलेले पाणी नळ योजनेच्या प्रकल्पित लोकसंख्येस पुरेसे असले तरी ते पिण्यायोग्य नसल्यामुळे त्याचा वापर करता येत नाही. सबब, उद्भवास लागलेले पाणी पिण्यायोग्य असल्याबाबत प्रयोगशाळेकडून प्रमाणित करुन घेण्यात यावे व नंतरच योजनेच्या पुढील कार्यवाहीस सुरुवात करण्यांत यावी.

७)  नळ योजनेतून होणारा पाणी पुरवठा मूलतः उद्भवावर आधारीत असल्यामुळे, सर्वप्रथम योजनेच्या उद्भवाचे काम हाती घ्यावे. उद्भवातून उपलब्ध होणारे पाणी पिण्यायोग्य आहे व ते नळ योजनेतील प्रकल्पित लोकसंख्येत विहित प्रमाणात पुरवता येईल याची खात्री झाल्यावरच योजनेच्या अन्य उपांगांची कामे हाती घेण्यात यावीत. प्रथम उद्भवाचे काम हाती न घेता, योजनेची अन्य कामे हाती घेतल्यास आणि दरम्यान नियोजित उद्भव अपुरा/कुचकामी ठरल्यामुळे निधीचा अपव्यय झाल्यास, संबंधित कार्यकारी अभियंत्यास जबाबदार धरण्यात येऊन त्यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

८)  नळ योजनेच्या उद्भवातील पाणी प्रदीर्घ काळ कमी पडू नये म्हणून, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या अधिका-यांशी विचारविनियम करुन व त्यांनी निश्चित केलेल्या जागी छोटे पाझर तलाव, भूमीगत बंधारे अशासारखी जास्तीत जास्त कामे रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात यावीत. ही कामे सुयोग्य व समयबध्द पध्दतीने होण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेने या कामांचा कृती आराखडा तयार करुन कृती आराखडयातील कामांची सर्वेक्षण अदांजपत्रके तयार करुन घ्यावीत. सदर आराखडयास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांनी जिल्हा परिषदेची मान्यता घ्यावी व रोजगार हमी योजनेच्या वार्षिक योजनेत आरखडयातील कामे समाविष्ट करण्यासाठी जिल्हाधिका-यांकडे पाठपुरावा करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(रु. न. देशमुख)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) विभागीय आयुक्त, (सर्व)
२) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई
५) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
६) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
७) कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
८) कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
९) उप अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१०) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता)
११) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१२) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१३) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१४) उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
१५) वित्त विभाग (व्यय-३, अर्थसंकल्प-१६)

१६) ग्राम विकास व जल संधारण विभाग (जल-२ व जल-४ कार्यासन क्र२५ व २७)
१७)पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन अधिकारी
१८) निवडनस्ती (पापु-०७)